आकाशवाणी नागपूर,

प्रादेशिक वृत्त विभाग

प्रादेशिक बातम्या (मराठी - वेळ सायंकाळी ६.००)

बुधवार दिनांक : २७, नोव्हेंबर, २०२४

ठळक बातम्या

1. हिवाळी अधिवेशनाच्या दुसऱ्या दिवशी विरोधी पक्षांच्या गदारोळानंतर संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब; उद्योगपती गौतम अदानींना अटक करण्याची राहुल गांधी यांची मागणी.
2. मुख्यमंत्रीपदासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी जो निर्णय घेतील त्याला शिवसेनेचा पूर्ण पाठिंबा असल्याची मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ग्वाही.
3. मतपत्रिकेवर मतदान घेण्यासाठी जनआंदोलन करणार असल्याची कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांची पत्रकार परिषदेत माहिती.
4. विदर्भात सर्वात कमी तापमानाची नोंद नागपुरात, पारा ११ पूर्णांक ७ अंश सेल्सियस वर.

#####

**संसद**

अदानी उद्योग समूहाच्या लाचखोरी प्रकरण आणि विविध मुद्यांवरून विरोधकांच्या गदारोळामुळे संसदेच्या दोन्ही सभागृहाचं कामकाज आज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर सभागृहात अदानी प्रकरण तसंच उत्तर प्रदेश आणि मणिपूरमधला हिंसाचार या मुद्द्यांवरून गदारोळ झाला. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना सदनाचं कामकाज चालवण्यासाठी सभागृहाचे शिष्टाचार आणि प्रतिष्ठा राखण्याची वारंवार विनंती केली. प्रश्नोत्तराच्या तासानंतर सर्व मुद्द्यांवर चर्चा केली जाईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. मात्र, विरोधकांनी सभागृहाच्या हौद्यात उतरून घोषणाबाजी सुरू ठेवली. त्यामुळे सभागृहाचं कामकाज दुपारी १२ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आलं. लोकसभेचं कामकाज सुरु झाल्यानंतर विरोधकांनी घोषणाबाजी करत आपला विरोध सुरू ठेवला. यामुळे सभागृहाचे कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. राज्यसभेत, सभागृहाचं कामकाज सुरू झाल्यानंतर अध्यक्ष जगदीप धनखड यांनी अदानी लाचखोरी प्रकरण, तसंच उत्तरप्रदेशातल्या संभल आणि मणिपूरहिंसाचार प्रकरणी विरोधकांनी मांडलेला स्थगन प्रस्ताव फेटाळला. सभागृहात गोंधळ सुरु राहिल्यानं

राज्यसभेचं कामकाज प्रथम साडेअकरा वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

दरम्यान, उद्योगपती गौतम अदानी यांच्यावर अमेरिकेत लाचखोरीचे गंभीर आरोप असून त्यांना अटक करावी, अशी मागणी लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केली आहे. संसदेच्या आवारात ते वार्ताहरांशी बोलत होते.

#####

**एकनाथ शिंदे/चंद्रशेखर बावनकुळे**

मुख्यमंत्रीपदासाठी भाजपचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी जो निर्णय घेतील त्याला शिवसेनेचा पूर्ण पाठिंबा आहे, असं शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्पष्ट केलं. ते आज ठाणे इथं वार्ताहरांशी बोलत होते.

***मी स्वतः काल आदरणीय प्रधानमंत्री मोदी साहेबांना फोन केला होता. तुम्ही घेतलेला निर्णय हा जसा भारतीय जनता पक्षासाठी जसा अंतिम असतो तसा आम्हालाही तो अंतिम आहे. काल मोदी साहेबांनाही फोन केला, अमित शहा साहेबांनाही फोन केला माझ्या भावना मी त्यांना सांगितल्या की सरकार बनवताना माझी कुठलीही अडचण मनामध्ये ठेऊ नका. तुम्ही जो निर्णय घ्यायचा तो तुम्ही घ्या आणि तो निर्णय मला मान्य असेल.***

मुख्यमंत्रीपदाच्या अडीच वर्षांच्या काळात आपली ओळख लाडका भाऊ अशी झाली याचं समाधान आहे, अशी भावना त्यांनी व्यक्त केली. महायुती सरकारच्या काळात केंद्राकडून कोट्यवधी रुपयांचा निधी मिळाला, अनेक महत्वाचे प्रकल्प पूर्ण झाले याचा आनंद असून पुढच्या पाच वर्षांत महायुती म्हणून एकत्र काम करायचं आहे असं शिंदे म्हणाले. महायुतीच्या राज्यातल्या प्रमुख नेत्यांची भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांच्याशी उद्या दिल्लीत भेट होणार आहे, त्यात सरकार स्थापनेबाबत निर्णय होईल, असंही त्यांनी सांगितलं.

दरम्यान शिंदे यांनी मुख्यमंत्री पदासाठी म्हणून जी भूमिका घेतली, ती योग्य आणि महायुतीच्या धोरणाला साजेशी असल्याचं भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे नागपुरात पत्रकार परिषदेत म्हणाले. शिंदेचा निर्णय महायुती भक्कम करणारा आहे असं त्यांनी सांगितलं.

मुख्यमंत्री पदाबाबत भाजपचे शीर्ष नेतृत्व आणि केंद्रीय कार्यकारणी निर्णय घेतील असं देखील त्यांनी स्पष्ट केलं.

त्याचबरोबर महायुती सरकार उत्तम काम करू शकते हा विश्वास असल्यानेच महाराष्ट्रातील 14 कोटी जनतेने मते दिली आहेत. महाविकास आघाडीकडून ईव्हीएमवर अविश्वास दाखवून मतदारांचा अपमान केला जात आहे, अशी टीका बावनकुळे यांनी केली. लोकसभेच्या

पराभवाच आम्ही आत्मचिंतन केल, त्यातून शिकलो आणि  पुढे गेलो. जनतेन डबल इंजिन सरकारला मतं दिली आहेत असं ते म्हणाले. आज सकाळी कामठी इथं  घेतलेल्या जनता दरबार पूर्वी वार्ताहरांशी ते बोलत होते.

#####

**नाना पटोले**

निवडणुका या मतपत्रिकेवर घ्याव्यात या प्रमुख मागणीसाठी कॉंग्रेस पक्षाकडून दोन दिवसांनी सह्यांची मोहीम राबवली जाणार असल्याची माहिती कॉंग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पाटोले यांनी आज मुंबईत झालेल्या पत्रकार परिषदेत दिली. यावेळी राज्यात स्पष्ट बहुमत मिळूनही अद्याप सरकार बनले नाही या घटनेचा त्यांनी निषेध केला. याप्रसंगी माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, आमदार विजय वडेट्टीवार यांच्यासह कॉंग्रेसचे पदाधिकारी उपस्थित होते.

कोट्यवधी सह्या घेऊन आम्ही मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी राष्ट्रपती, पंतप्रधान, सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती आणि निवडणूक आयोग यांना निवेदन देऊन करणार आहोत, असं पटोले यांनी सांगितलं.

आपण मत एकाला केलं आणि सरकार दुसरेच आले अशी भावना राज्यात  निर्माण झाली आहे. त्यामुळे ही लोकशाही वाचवण्याची लढाई काँग्रेस पक्ष लढणार असल्याचंही  ते म्हणाले.

#####

**अश्विनी वैष्णव**

समाज माध्यमावर प्रसारित होणारा अश्लील मजकूर रोखण्यासाठी सध्याचे कायदे आणखी मजबूत करणं गरजेचं असल्याचं प्रतिपादन माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी केलं आहे. लोकसभेत आज पुरवणी प्रश्नांना उत्तर देताना वैष्णव म्हणाले की, समाज माध्यम हे आजघडीला वृत्तपत्रीय स्वातंत्र्याचं मोठं माध्यम असलं तरी त्यावरच्या आशयाचं संपादन होत नसल्यामुळे अनेक प्रकारचे अश्लील मजकूर देखील प्रकाशित केले जातात.  त्यामुळे संसदेच्या स्थायी समितीन हा मुद्दा उचलून धरावा आणि त्यासाठी कठोर कायदे करावेत असं प्रतिपादन त्यांनी केलं.

#####

**इफी**

पंचावन्नाव्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवाचा उद्या समारोप होत आहे. गोवा इथं दिग्दर्शक तथा निर्माते आशुतोष गोवारीकर यांच्या अध्यक्षतेखाली सुरु असलेल्या या महोत्सवात तपन सिन्हा यांच्या हार्मोनियन या चित्रपटासह जवळपास ७० चित्रपट आज दाखवले जात आहेत. महोत्सवातल्या शताब्दी सत्रात, तपन सिन्हा यांची फिल्मोग्राफी, कथावाचनाची अनोखी शैली आणि भारतीय चित्रसृष्टीत त्यांचं योगदान यावर चर्चा होईल. अर्जुन चक्रवर्ती, एन. मनु चक्रवर्ती आणि प्रख्यात अभिनेत्री शर्मिला टागोर या चर्चेत सहभाग घेतील.

#####

**जनजागृती रॅली**

गडचिरोली जिल्हा प्रशासन, जिल्हा महिला आणि  बाल विकास विभाग आणि 'स्पर्श' संस्थेच्या संयुक्त विद्यमान बालविवाह मुक्त भारत अभियानांतर्गत गडचिरोली शहरात बालविवाह मुक्त गडचिरोलीचा संकल्प करून जनजागृती रॅली काढण्यात आली. उप विभागीय पोलिस अधिकारी सूरज जगताप यांनी हिरवी झेंडी दाखवून रॅलीचा शुभारंभ केला. या रॅलीत शहरातील विविध शाळांचे विद्यार्थी सहभागी झाले होते. त्याचप्रमाणे भारतीय ग्रामीण शिक्षण प्रसारक मंडळ चंद्रपूरद्वारा संचालित भवानजीभाई चव्हाण हायस्कूल तथा कनिष्ठ महाविद्यालय इथं देखील  बालविवाह मुक्त भारत अभियानाचा आरंभ  करण्यात आला.

#####

**राष्ट्रीय युवा महोत्सव**

राष्ट्रीय युवा महोत्सवाच आयोजन 12 ते 16 जानेवारी 2025 या कालावधीत दिल्ली इथं होणार आहे. या अनुषंगान राष्ट्रीय युवा महोत्सवामध्ये सहभागी होण्यासाठी विकसित भारत यंग लिडर्स डायलॉगसाठी  माय भारत पोर्टलवर नोंदणी करून स्पर्धेत सहभागी होण्याच आवाहन युवा कार्यक्रम व खेळ मंत्रालय आणि  शालेय शिक्षण व साक्षरता विभाग भारत सरकार यांनी केलं आहे.

#####

**स्वाधार योजना**

शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जाती आणि नवबौध्द घटकांतील विद्यार्थ्यांसाठी राज्य शासनानं भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना सुरू केली आहे. या योजनेअंतर्गत अर्ज करण्याची अंतिम तारीख ३० नोव्हेंबर आहे. विद्यार्थ्यांनी या योजनेसाठी HMAS.MAHAIT.ORG या संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज करून अर्जाची प्रत

सर्व कागदपत्रांसह सहायक आयुक्त कार्यालयात जमा करावी, असं आवाहन समाज कल्याण सहायक आयुक्त समाधान इंगळे यांनी केलं आहे.

#####

**एकात्मिक आदिवासी विकास**

आदिवासी विकास विभागांतर्गत एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प पांढरकवडाच्यावतीन शासकीय माध्यमिक आश्रम शाळा चिचघाट इथं क्रीडा स्पर्धांच आयोजन करण्यात आलं आहे. स्पर्धेच उद्घाटन आज जिल्हाधिकारी डॉ.पंकज आशिया यांच्या हस्ते झालं. शासकीय आणि अनुदानित आश्रमशाळांच्या प्रकल्प स्तरीय या क्रीडा स्पर्धा दिनांक 27 ते 29 नोव्हेंबर या कालावधीत पार पडणार आहे.

#####

**हवामान**

विदर्भात गेल्या 24 तासात नागपुरात सर्वात कमी 11 पूर्णांक 7 अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद करण्यात आली आहे. त्यानंतर गोंदिया येथे 11 पूर्णांक 9 अंश सेल्सिअस इतकं तापमान नोंदवण्यात आलं, ब्रह्मपुरीत बारा पूर्णांक तीन अंश सेल्सिअस इतक्या किमान तापमानाची नोंद झाली. उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये तापमान तेरा अंश सेल्सिअस ते 14 अंश सेल्सिअस दरम्यान आहे.  सर्वाधिक कमाल तापमान अकोला इथं ३० पूर्णांक ८ अंश सेल्सियस इतक नोंदविण्यात आलं.

#####